# नारायण सुर्वेंच्या कवितेतून व्यक्त होणारी सामाजिक व वर्गीय जाणीव

**प्रा. श्रीमती. सुहास सूर्यकांत आजगांवकर**

सहाय्यक प्राध्यापक

पाटकर -वर्दे महाविद्यालय

गोरेगाव-(प) मुंबई ४००१०४

---

**प्रस्तावना-**

मराठी साहित्यात सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक,राजकीय आत्मिक,मानसिक अश्या व्यापक स्वरूपाचा संघर्ष असलेला दिसतो.नाटकात येणारा संघर्ष एक प्रकारचा ताण निर्माण करण्यासाठी केलेला असतो.संघर्ष ताण निर्माण करतात. कवितेतील जाणीवा ह्या देखिल विविध प्रकारच्या तणावातून निर्माण झालेल्या असतात.नारायण सुर्वेच्या कवितेतून हा ताण कलात्मक पातळीवर येतो. सुर्वे पूर्व कवितेत ,कवी बा.सी.मर्ढेकर यांच्या कवीतेत यंत्रयुगाने निर्माण केलेल्या भीषण समस्या जाणवल्या त्या अधोरेखित केल्या आहेत.यंत्रयुगाने भरडलेल्या,पिचून काढलेल्या श्रमिकांची, कष्टक-यांची अवस्था पाहून What man has made of man.असे उद्गार वर्डस्वर्थने काढले होते. याच उद्गाराचे ‘नरेचि केला हीन किती नर ‘असे केशवसुतांनी रूपांतर केले आहे. सुर्वेंच्या कवितेचा मर्ढेकरांच्या कवितेच्या पार्श्वभूमीवर विचार करावा लागतो. मर्ढेकरांनी वैफल्याचे चित्रण अधिक केले कारण त्यांना ते अधिक दिसत होते.उलट सुर्वे यांच्या कवितेत दुःख ,दैन्य, दारिद्रय व्यथा यांचे भयानक दर्शन घडत असले तरी त्यांच्या कवितेत नव्या जगण्याबद्दलची श्रद्धा आशावाद,दिसून येतो. भोवतालच्या श्रमिकांच्या अंतःकरणात आशावादाचे पडसाद उमटतांना ऐकू येतात. त्यामुळे नारायण सुर्वे यांची अनुभव दृष्टी ही हातावर पोटअसणारे मजूर,कामगार, कायकर्ते,शरीरविक्रय करणा-या वेश्या यांनी गजबजलेली आहे. आधुनिकीकरण होत असल्याचे दुःख ही त्यातून व्यक्त झालेले आहे.

स्थूलमानाने अज्ञान ,दारिद्र्य, कष्ट ,उपासमार, विषमता हे मराठी सामाजिक कवितेचा विषय परिसर असलेला दिसून येते. माणसांमधील भेद, तफावत ‘ आहे रे ‘ व ‘नाही रे ‘ वाल्यांमधील सर्व प्रकारची दरी, अंतर ,गरिबांची फसवणूक, छळवणूक इत्यादी संबंधाने सामाजिक कवितेतून जोरदार हल्ले चढवलेले आहेत. पूर्वसुरीच्या कार्यकर्तृत्वाचा गौरव केलेला आहे . तसेच स्वातंत्र्यासाठीच्या क्रांतीकार्याचा जयघोष ही केला आहे .एकूणच अंतरीच्या उमाळ्यापेक्षा भावनांपेक्षा वरलीया रंगाचे रोंगण अधिक आहे. पण तरी या कवितांमधून सामाजिक जीवनाविषयीची आस्था, प्रेम प्रगट झालेले दिसून येत नाही असे मात्र म्हणता येणार नाही.

नारायण सुर्वे यांची सामाजिक जाणिवेची कविता जेव्हा अभ्यासतो, तेव्हा ती वेगळी व अलग असलेली दिसते . त्यांनी सामाजिक जाणिवेच्या कवितेची वेगळी वाट चोखंदळलेली लक्षात येते . सुर्वेंच्या आधीच्या कवितेत शेतकरी, मजूर ,कामगार त्यांच्यावरचे अन्याय, त्यांच्या स्त्रियांचे दुःख, संसाराची परवड, सर्वव्यापी विषमता ,अज्ञान ,दारिद्र्य, त्यात खितपत मरणे हे जीवनमरणाचे सर्व रंग त्या कवितेत आले आहे .परंतु त्यांच्या जीवनाची वेदना आणि विविध विभ्रम मात्र त्यात नाहीत. नारायण सुर्वे इथेच वेगळे ठरतात. कवी कुसुमाग्रजांनी असे म्हटले आहे की “नारायण सुर्वे हे कामगार जीवनाशी केवळ समरस झालेले नाही तर ते प्रत्यक्ष जीवन अनुभवणारे कवी आहे.” सुर्वे समाजाच्या ज्या स्तरात जन्मले ,वाढले त्या स्तरातील सर्वार्थाने नागड्या, पिचलेल्या शोषित

Research Hub International Journal

समाजाच्या व्यथा - वेदना घेऊन ते सरस्वतीच्या मंदिरात आले, चोखामेळा प्रमाणे ते पददलितांची आणि कष्टकरी कामगारांची भौतिक आणि मानसिक दुःख बोलू लागले .

सुर्वेंच्या कवितेतून येणारा कामगार हा केवळ गिरण्यांमधून काम करणारा कामगार नाही, मजूर नाही, तेवढाच त्याचा ढोबळ अर्थ नाही. गिरणीतील मजूर डोळ्यासमोर असला तरी प्रतिनिधिक आहे. सुर्वेची सहानुभूतीची कक्षा व्यापक असल्याने वैयक्तिक अनुभव सार्वत्रिकरूप धारण करतात असे दिसून येते..कवीला आलेल्या उत्कट अनुभवांपेक्षा अनुभव घेण्यातली उत्कटता अधिक महत्वाची आहे. त्याचा प्रत्यय सुर्वेंच्या सामाजिक कवितेमधून अधिक येतो. औद्योगीकरणामुळे शहरांचे महानगर झाले .कारखानदारी वाढली, उद्योग व्यवसाय वाढले त्यामुळे नवे उत्पादन संबंध निर्माण झाले. सामाजिक संबंध निर्माण झाले. नवे वर्ग अस्तित्वात आले ,कामगार ,कष्टकरी ,मजूर आदींचे नवे वर्ग आपल्या हक्कांसाठी ,न्यायासाठी लढू लागले आणि प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध विद्रोह करू लागले. नारायण सुर्वेची कविता ह्या श्रमिक वर्गाची त्यांच्या व्यथा वेदनांची जीवन संघर्षाची कविता आहे. सुर्वे यांनी आपल्या कवितेतून उपेक्षित राहिलेल्या कष्टकऱ्यांचे वास्तव जीवनाचे दर्शन घडवले आहे श्रमिकांच्या जगाचा भावानुभव त्यांनी आपल्या कवितेतून व्यक्त केला आहे.

चार शब्द कवितेमधील -

"कामगार आहे मी, तळपती तलवार आहे
सारस्वतांनो ! थोडासा गुन्हा करणार आहे."

ही पहिल्याच कडव्यातील शेवटची ओळ आणि सारस्वतांनो, थोडासा गुन्हा करणार आहे ही कवितेची अखेरची ओळ, पाहिली तर हे सांगणे सरळ नाही .'हे सारस्वत 'माझ्या जगाच्या बाहेरचे आहेत. कामगारांचे असणारे माझे जग आणि त्यांच्या बाहेरील जगात असणारे हे सारस्वत ( म्हणजे विद्वान अभ्यासक) बाहेरील जग म्हणजे प्रस्थापितांचे सुसंस्कृत म्हटले जाणाऱ्यांचे जग आहे ही वर्गीय जाणीव व्यक्त झालेली आहे. 'आमुची दुनिया ' 'माफ करा' 'झेप 'या कविता मधून निवेदकाला कष्टकऱ्यांचे जग आणि त्या बाहेरील सुखवस्तू जग यातील ताण सहज जाणवतो .या कवितांमध्ये कष्टक-यांच्या वर्गाची असणारी संघर्षशीलता ,जे वास्तव आहे त्याला भिडण्याची वृत्तीच प्रगट होते. या कष्टकरी वर्गांची एक दुनिया आहे. 'आहे रे वाल्याच्या' दुनिये पेक्षा ही ' नाही रे ' वाल्याची दुनिया आहे .युद्ध बेतण्या ऐवजी बुद्ध निर्माण करणारी ही दुनिया आहे. म्हणूनच निवेदक म्हणतो,

"तुम्ही अशाश्वताची उकरून काढा मढी
मी शाश्वताची ही रोविन त्यावर गुढी |"

दोन दुनियेतील हा फरक कवीने स्पष्ट केलेला आहे. या कष्टकऱ्यांच्या दुनियेतील श्रमिकांचे सृजनशील बाहू दारिद्र्यापाशी गहाण पडतात आणि ते कधी वर उठले तर 'आहे रे 'वाल्यांकडून कलम केले जातात .ही वर्गीय जाणीव प्रभावीपणे ' ऐसा गा मी ब्रह्म ' मधून व्यक्त झालेली आहे.

नारायण सुर्वे हे आशावादी आहेत .दारिद्र्याचे उन व दास्याचा काळा कुट्ट अंधार समोर असला तरी दुस-यांच्या जीवनात प्रकाश निर्माण करण्यासाठी हे कष्टकरी जनता चालत राहणार आहे. जगणे कठीण झाले तरी घडीभर अंतरानंतर पहाट येणार याची कवीला जाणीव आहे .सुर्वेंच्या श्रमिकांचा ऐक्याच्या सामर्थ्यावर विश्वास आहे .शेवटी कष्टातून जीवनाचा मार्ग उजळणार आहे याची कवीला जाणीव आहे .

"माझी खरी शक्ती ! आहे जनभक्ती
तेथेच गा मुक्ती | चिरंतन"

सुर्वेंच्या ‘माझे विद्यापीठ ‘मध्ये ही वर्गीय जाणीव प्रभावीपणे व्यक्त झाली आहे .ती अधिक खोल झाली आहे . ही जाणीव वर्गीय (राहिल्यामुळे ) मानवतेच्या पातळीवर टिकून राहिली ,अधिक विश्वात्मक झाली.

“याकुब मेला दंग्यात ,नव्हते नाते, तरीही माझ्या डोळ्याचे पाणी खळले नाही
उचलले प्रेत तेव्हा मिलाद -कलमांच्या गजरात मिसळल्याशिवाय राहिलो नाही”

अशी जाती-धर्मातीत जाणीव कवीमनातून व्यक्त झालेली आहे.

‘मुंबई’ या कवितेत सुर्वे कामगारांच्या जीवनाचे भेदक वास्तव्य उभे करतात. एका कामगार पिढीने दुसऱ्या पिढीकडे फक्त दारिद्र्याचा वारसा द्यावा आणि ते सर्व आयुष्य राबण्यात जावे, ही भांडवली लोकशाहीची देणगी आहे .ही जाणीव खालील काव्यपंक्तीतून व्यक्त झाली आहे –

“पटकूर खांद्यावर टाकून , सह्याद्री घाट उतरून,
माझा बाप तुझ्या दारावर उभा राहिला श्रम घेऊन”

ह्या कष्टकऱ्यांच्या जगण्याची ही त-हा निवेदकाच्या निवेदनातून व्यक्त झाली आहे .

“असे आम्ही लक्षावधी नाहीतर दिवस असे तो वावरतो
राबता राबता आयुष्या मेणबत्ती सारखे विझवून घेतो”

ही जाणीव वैयक्तिक न राहता समष्टीचे रूप धारण करते म्हणून ‘ मुंबई ‘ ही कविता एकट्या कवीची /निवेदकाची कविता न राहता सर्व श्रमिकांचा तो हुंकार असतो.

श्रमजीवी कष्टकरी जीवनाचे दर्शन घडवणाऱ्या सुर्वे यांच्या कवितेला समाज जाणिवेची भक्कम बैठक आहे. कष्टकऱ्यांच्या उपेक्षितांच्या जगाचे तिथल्या वास्तवाचे सुचकतेचे दर्शन ‘माझे विद्यापीठ’ ‘ पोष्टर ‘ ‘पाणी घे‘ या कवितांमधून घडते.

‘जाहीरनामा’ या कवितासंग्रहात सूर्व्यांची कविता ही पूर्वीपेक्षा अधिक परिपक्व झालेली दिसते .ती वर्गीय जाणीवेच्या शास्त्रीय पायावर उभे राहून ते अधिक वैश्विक जाणीव साकारते . ‘जाहीरनामा’ ‘कालमार्क्स ‘ सारख्या कवितेतील क्रांती , आक्रमकता ,आवेश कमी होऊन त्या जागी एक शांत, मानव सन्मुख दृष्टिकोन आलेला दिसतो. ‘कालमार्क्स ‘ कडे वेगळ्या दृष्टिकोनातून पाहिले जाते. मानव मुक्तीचा मंत्र देणा-या साम्यवादी विचारांचा सम्यक क्रांतीचा जनक म्हणून पाहिले जाते. सुर्वे मार्क्सवादाच्या आर्थिक ,राजकीय सामाजिक, पैलू ऐवजी मानवतेच्या पैलूवर अधिक भर देतात.

हे शब्द हटवा……… हे पुतळे …….स्थिती स्थापक
हवा आहे मनासारखा नवजाहीरनामा म्हणून |

जगातील वास्तवाला बदलू पाहणारी अशी समग्रलक्षी जाणीवच वरील कवितेतून व्यक्त झाली आहे.

नारायण सुर्वे यांची सामजिक आणि वर्गीय जाणिवेची कविता ही केवळ कामगार ,कष्टकऱ्यांशी निगडित आहे पण या निगडीतेचा अर्थ कामगारांच्या अंतर्जीवनाशी, त्यांच्या चालू अवस्थेशी ,त्यांच्या फेर बदलांशी संबंधित आहे .तिचे जीवन सीमित झालेले नाही तर त्या संगतीने कवितेला अवतीभवतीच्या परिस्थितीची जाण आहे ,आवर्जून दखल घेण्याचा तिचा प्रयत्न आहे असे स्पष्ट होते. सुर्वेची कविता मुंबईचे डोळा देखता वर्णन करते .

“ओसांडू पाहतो आहे हृदय घट सांग कुठे करू रीता ,
घडवून गेला माझा बाप तुजसम स्फूर्तिदायी कविता” ,

कामगारांची रंगभूमी ,रणभूमी म्हणजे “लालबाग “ दुःखदर्द उराशी बाळगून झुंजणे, रस्त्यात फुलांच्या माळा

शृंगारून मरणाला मारून धावणे ,हे या रणभूमीचे लालबागचे वैशिष्ट्य. एका बाजूला यंत्राला तर दुसऱ्या बाजूने दुःखाला जोडल्या गेलेला लालबागची दर्दभरी कहाणी सुर्वे सांगतात.

"मुंबईच्या धमन्या मुठीत घेऊन
वेशीवर येथे रणगाडे घेऊन,
पर्वतासम खडा ठाकतोस घेऊन,
विजेची पोलादी समशेर घेऊन"

ह्या लालबाग परिसराने अवतीभवतीच्या आणखी काही वसाहती सांभाळल्या आहेत. ' नेहरू गेले त्यावेळची गोष्ट' ' पोष्टर 'या कवितांमधून त्याचा उल्लेख येतो .त्यांचे अंर्तविश्व प्रत्ययाला येते.

"क्या हुआ सुंद्रे !
आज लोबान मत जला |नेहरू गये
सच, तो चलो आज छुट्टी !"

शीण पेलणारे जग खाटेवर कलले.

'नेहरू गेले त्यावेळची गोष्ट ' कवितेतील ही वेश्येची प्रतिक्रिया खूपच बोलकी आहे 'पोष्टर' ही सुद्धा अति सामान्यांच्या जीवनातील भेदक जाणीव साकारणारी कविता आहे. नाराज होणारी ,दारिद्र्यामुळे कुथत बसणारी ही कवितेतील तरुण पोरे नाहीत. हातपाय गाळून बसणारी ही नाहीत .सुर्वे अशा विविध कवितांमधून जनसामान्यांच्या काळजातील आर्तस्वर टिपू पाहतात.

सुर्वेच्या कवितेत मानवाच्या संदर्भातच देशाचा विचार केलेला दिसतो .त्यामुळे राष्ट्रीय आंतराष्ट्रीय जाणीवांचा संगम (वैश्विक जाणीवा) घडून येतो .उदा. "माझ्या देशाच्या नोंद बुकात माझा अभिप्राय " या कवितेत सबंध भारताशी कवी सहृदयतेने संवाद साधतात नवा भारत शोधतात. सुर्वे यांच्या कवितेत जशी जीवन विषयक जाणीव व्यक्त होताना दिसते,तशी उणीव ही व्यक्त होते.' जाहीरनामा' या काव्यसंग्रहात जीवन विषयक साकल्याने भरलेली जाणीव व प्रगल्भ जीवन दृष्टिकोन व्यक्त झालेला दिसतो . ऐसा गा मी ब्रम्ह ', 'माझे विद्यापीठ' मधील गुण आत्मसात करून त्याचे काव्य व्यापक बनते .सुर्वेच्या कवितेत वैश्विक जाणिवेतून अखंडित आणि साकल्यात्मक मानवतेच्या जाणिवेतून मानवतेचे दर्शन प्रभावीपणे घडवतात.

**निष्कर्ष-**

थोडक्यात , नारायण सुर्वे यांची कविता कामगार ,मजूर,शेतकरी,कार्यकर्ते शरीरविक्रय करणा-या वेश्या यांनी गजबजलेली आहे. ह्या सर्वांच्या जीवनातील व्यथा ,वेदनांचे विविध विभ्रम रेखाटतांना दिसतात.जीवन मरणाचे सर्व रंग सुर्वे यांच्या कवितेत येतात.सुर्वेच्या कवितेतील कामगार केवळ गिरणी कामगार नाही.गिरणीतील मजूर डोळ्यासमोर असला तरी तो प्रातिनिधीक आहे. सुर्वेची सहानुभूतिची कक्षा व्यापक असल्याने वैयक्तीक अनुभव व्यापक रूप धारण करतात. त्यामुळे उत्कट अनुभवापेक्षा अनुभव घेण्यातली उत्कटता महत्वाची ठरते.त्याच बरोबर कवितेतून व्यक्त होणारी नव्या जगाबद्दलची श्रद्धा ,आशावाद, ह्या गोष्टी व्यापक बनतात. आशावादाचे पडसाद भोवतालच्या श्रमिकांच्या अंतःकरणात उमटतांना ऐकू येतात. यासर्व गोष्टींमुळे सुर्वेची सामाजिक आणि वर्गीय जाणिवेची कविता वैशिष्ट्यपूर्ण ठरते.

Research Hub International Journal

**संदर्भ सूची-**


- सुर्वे यांचे विद्यापीठ-संपादक पुष्पा राजापुरे, संदर्भ प्रकाशन ,प्र.आ. डिसेंबर १९९३.
- कहाणी कवितेची- नारायण सुर्वे -डिंपल प्रकाशन,प्र. आ- मे-२०१०
- मराठी काव्याचे मानदंड- खंड-२ -डॉ.स.रा.गाडगीळ. पद्मगंधा प्रकाशन,प्र. आ. नोव्हेंबर २००५
- माझे विद्यापीठ- नारायण सुर्वे-पाप्युलर प्रकाशन प्र.आवृत्ती.
- ऐसा गा मी ब्रम्ह- नारायण सुर्वे- पाप्युलर प्रकाशन


Research Hub International Journal